# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक क्र. मशिमाक/ १६ /२०२५–२०२६**

विषय : विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/ संस्था येथील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांना बायोमेट्रिक प्रणालीद्वारे त्यांची उपस्थिती नोंदविणे व उपस्थिती नियमितपणे तपासणे बाबत...

**परिपत्रक:**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत व कायम विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स, समाजशास्त्र आणि विज्ञान व तंत्रज्ञान शाखेशी निगडीत अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, व्यवस्थापन, फार्मसी महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक व महाविद्यालयांतर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, महामहिम, माननीय राज्यापालांचे उपसचिव यांचेकडून क्र. RB/Gen-2024/CR-928/Edn.5/357 दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजीचे माननीय कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांना प्राप्त झालेल्या पत्रात बायोमेट्रिक उपस्थिती अनिवार्य करण्याबाबत पुढील प्रमाणे कळविलेले आहे:

> **."The Universities should make the bio-matric attendance compulsory for all staff and the students in university department as well as for the all colleges/institutes affiliated to the University. The monitoring of the attendance should be done regularly."**

त्यानुसार, माननीय कुलगुरूंच्या आदेशानुसार असे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था येथील कार्यरत शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रिक पद्धतीने नोंदविण्यात यावी. त्यांच्या उपस्थितीबाबत नियमितपणे तपासणी करून अभिलेख सुरक्षित ठेवण्यात यावा.

तसेच सदर बाबत सर्व संबंधित शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांना अवगत करण्यात यावे.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– ~~जुलै~~, २०२५
२ ऑगस्ट

( डॉ. प्रसाद कारंडे )
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

..२/–

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत व कायम विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि समाजशास्त्र आणि विज्ञान व तंत्रज्ञान शाखेशी निगडीत अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, व्यवस्थापन, फार्मसी महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीकरिता रवाना :

१. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यानगरी कॅम्पस, कलिना, मुंबई–४०००९८.
२. मा. संचालक, विद्यार्थी विकास विभाग, बी–रोड, विद्यार्थी भवन, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०.
३. उपकुलसचिव, पात्रता /नावनोंदणी, प्रवेश विभाग, विद्यानगरी कॅम्पस, कलिना, मुंबई–४०००९८
४. उपकुलसचिव, महाविद्यालय संलग्नता विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
५. कुलगुरूंचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
६. प्र–कुलगुरूंचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
७. कुलसचिवांचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
८. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

( डॉ. प्रसाद कारंडे )
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ